महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीवीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.org
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./SMURH/IT/२०२३/१६३३ दि: ०९/१०/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणेबाबत.**

संदर्भ :- मा. श्री. गया प्रसाद, उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.D.O.M-१२०१६/१९/२०१६-RH (M & T), दि.०९/१०/२०२३.

"सर्वांसाठी घरे-२०२४" या धोरणांतर्गत राज्यातील सर्व बेघर व कच्च्या घरात वास्तव्य करणाऱ्या पात्र कुटुंबांना मुलभूत सुविधायुक्त पक्के घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी दि. १ एप्रिल, २०१६ पासून राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण राबविण्यात येत आहे.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १३,८७,५६७ मंजूर घरकुलांपैकी ११,८४,८९६ इतकी घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. परंतु आजमितीस २,०८,५२४ इतकी घरकुले अपूर्ण आहेत. त्यापैकी ४२,०३७ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, १,३९,६३९ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, ६४,३१० लाभार्थ्यांना तिसरा हप्ता वितरीत करणे अजूनही प्रलंबित आहे. राज्याच्या PMAY-G च्या SNA मध्ये ५७५.७३ कोटी रुपये खर्च न केलेले शिल्लक आहेत. सबब या उर्वरित मंजूर लाभार्थ्यांना हप्ते वितरीत करण्यात कोणतीही अडचण नाही. तसेच पहिला हप्ता वितरीत केल्यापासून १२ व १८ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी पासून ९३,१८३ इतकी घरकुले प्रलंबित आहेत, अशी सर्व प्रलंबित घरकुले प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत मा. उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत सूचना प्राप्त झाल्या आहेत.

राज्य शासनाने वार्षिक कृती आराखडा सन २०२२-२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व अपूर्ण घरकुले दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करणेबाबत वचनबध्दता दिली आहे. त्यानुषंगाने २,०८,५२४ इतकी अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी प्रतिदिन २,४२५ इतकी घरे पूर्ण करणे अपेक्षित आहे. परंतु सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्याची घरकुल बांधकामाची सध्याची गती ९३४ घरे प्रतिदिन, अशी आहे. महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरे पूर्ण होण्यासाठी सरासरी ३९५ दिवस लागतात आणि त्यामुळे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी घरांच्या बांधकामाला गती देण्याची गरज आहे.

तरी राज्य शासनाने दिलेल्या वचनबध्दता नुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व अपूर्ण घरकुले दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी योग्य ते नियोजन करुन, आपले अधिनस्त प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व ग्रामसेवक यांना उद्दिष्ट देवून तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपले स्तरावरुन सूचित करावे, ही विनंती.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत :**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.